मुलाखत - प्रतिष्ठान

# *संमेलनाध्यक्ष नरेन्द्र चपळगावकर यांची मुलाखत*

*तुमच्या आयुष्याचे पहिले दशक म्हणजे निजामी राजवटीचे शेवटचे दशक. या काळाचे कोणते संस्कार बालवयात तुमच्यावर झाले?*

खरं म्हणजे सामान्यत: या वयातलं माणसाला फार कमी आठवतं. बालपण जर चार चौघासारखं असेल तर त्याच्यात लक्षात राहण्यासारखं वेगळं नसतंही. परंतु माझ्या जन्माच्या नंतर तीन महिन्यांतच वडील चळवळीच्या निमित्ताने तुरुंगामध्ये गेले होते. सुटून आल्यावर चळवळ हेच वडलांच मुख्य काम झाले. आमच्या घरी कार्यकर्त्यांची ये- जा वाढली. नातेवाईकांपेक्षा वडलांचे हे मित्रच लहानपणी माझ्या अधिक ओळखीचे झाले. त्यातल्या अनेकांना मी काका म्हणून ओळखू लागलो. एखादा पूर्णवेळ कार्यकर्ता आमच्या घरी रोज जेवायलाही असे. तोही आमचा कुटुंबीय आहे अशीच माझी व माझ्या भावंडांची त्यावेळी समजूत होती. वडील वकील असले तरी घरची परिस्थिती अशी होती की आई- वडलांचे किंवा आजीचे माझ्यावरील प्रेम भेट वस्तूंची खरेदी करून व्यक्त करणे त्यांना फार कमी वेळा शक्य होत असे. काही वेळा नागनाथ परांजपेसारखे कार्यकर्ते आणि वडील बीड जवळच्या एखाद्या खेड्यात सायकलवर चांदण्याराात्री गावकऱ्यांच्या बैठकी घेण्यासाठी जात कधीकधी त्यांच्याबरोबर मीही हट्टाने जाई. त्यावेळी सभा एखाद्या व्यायामशाळेत अगर देवळाच्या चौदिवारीत रात्री होत. दिगंबरराव बिंदू किंवा दुसरे कोणी बाहेरचे नेते आले तर कधी काका मलाही त्यांच्याबरोबर येऊ देत. वडील माझ्या येण्याला कधी विरोध करीत नसत. कळता होत गेलो तसतसे सरकारने लोकांवर केलेल्या जुलुमाबद्दलच्या कहाण्या माझ्याही कानावर अप्रत्यक्षपणे पडत गेल्या. घरी वडलांना भेटायला अनेक कार्यकर्ते - मित्र येत. त्यांचे बोलणे होत असताना वडलांचे मागे बसून ऐकण्याची मला सवय होती व तिला वडलांनी कधी प्रतिबंध केला नाही. त्यामुळे शहाणपणाचे माहीत नाही पण माहिती मात्र इतर मुलांच्या मानाने मला अधिक होत गेली. वडलांना, त्यांच्या मित्रांना आणि सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांना पकडणाऱ्या सरकारबद्दल अप्रीती आपोआपच माझ्याही मनात निर्माण होत गेली.

पाचवीच्या वर्गात गेलो तेव्हा आणखी एक गोष्ट घडली. मराठी माध्यमातून माझे शिकणे बंद झाले. शाळा खासगी असली तरी चौथीनंतरच्या शिक्षणात उर्दूशिवाय इतर माध्यमांना परवानगी नव्हती. इतिहास, भूगोल, गणित यासारखे विषयसुद्धा उर्दूतूनच शिकणे हा पारतंत्र्याचा नवा अर्थ वयाच्या नवव्या वर्षीच कळाला.

*तुमची जडणघडण होताना कोणकोणत्या व्यक्तींचा तुमच्यावर विशेष परिणाम झाला? तुमचे वडील निष्णात वकील आणि हैदराबाद मुक्तिलढ्याचे एक नेते. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या सहभागामुळे कुटुंबावर व पर्यायाने तुमच्यावर कोणते परिणाम झाले?*

माझे वडील कनिष्ठ मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातले. घरची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसताना माझ्या आजीने आजोबाच्या माघारी वडलांचे व माझ्या चुलत्यांचे शिक्षण केले. माझ्या आईवरही माहेरी विद्यार्थीदशेत स्वातंत्र्य लढ्याचे संस्कार झाले होते. बुद्धिमत्ता आणि कायद्याचे ज्ञान दोन्हीही चांगले असून, अधूनमधून वकिली आणि अधूनमधून चळवळ या वडलांच्या आयुष्यक्रमाचा परिणाम कुटुंबाच्या आर्थिक स्थितीवर होणे स्वाभाविक होते. अर्थात घरात त्याची कुणालाच खंत नव्हती. माणसांचा राबता नेहमी असायचा आणि हसतमुखाने घराने जमेल तसे पाहुण्यांचे स्वागत करायचे. वडील तुरुंगामध्ये किंवा चळवळीच्या निमित्ताने फिरतीवर असले तर घरात आई आणि आजी दोघीच मोठ्या. वडील अस्पृश्यता पाळीत नसत व काही दलित नेते त्यांचे मित्र होते व ते घरीही येत. त्यामुळे थोड्या सनातनी मंडळीच्या मनात राग असला व चार- दोन वर्षे त्यांनी वडलांवर बहिष्कारही घातला असला तरी सर्वसामान्य माणसांच्या मनात वडलांच्याबद्दल आणि त्यांच्या कामाबद्दल आदर असे. वडलांना मला जवळ बसवून बोलण्याला फार कमी वेळ मिळे. परंतु त्यांच्या वागण्याचा मात्र मोठा संस्कार आपोआप होत होता. त्यांनी जवळपास साठ वर्षे वकिली केली; पण पुरेशी फी नाही म्हणून कोणत्याही पक्षकाराला परत पाठविले नाही. दिवाणी कायद्यातले तज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याती होण्यास त्यांचा व्यासंग कारणीभूत झाला. तशीच त्यांची सचोटी हीसुद्धा आदराचा विषय होती. विरुद्ध बाजूच्या वकिलाला जर त्याची बाजू नीट मांडता आली नाही तर कित्येकवेळा न्यायाधीश वडलांना तुमच्या बाजूच्या विरुद्ध काही निवाडे आहेत काय? असाही प्रश्न विचारीत व वडलांच्याकडून नि:पक्षपाती व खऱ्या सल्ल्याची अपेक्षा करीत. कायद्याची तरतूद काय आहे याबद्दल किंवा दाखल झालेल्या कागदपत्रातील नोंदी काय आहेत याबाबत चुकीची माहिती वकिलांनी कधीही देऊ नये व त्याने सांगितल्यावर न्यायाधीशाला परत कागदपत्रे तपासण्याची आवश्यकता वाटू नये एवढा विश्वास त्याच्याबद्दल असावा असे वडलांना वाटे. त्यांच्याकडे

काम खूप आले. परंतु त्यांच्या स्वभावामुळे उत्पन्न फक्त पुरेसे असे. वडलांच्या या व्यावसायिक सचोटीने माझे मनही प्रभावित झाले.

राजकारणातसुद्धा वडील ज्या पद्धतीने वागले त्यामुळे सत्तेच्या प्रत्यक्ष लाभापासून ते दूरच राहिले. स्वामी रामानंद तीर्थांचे ते अनुयायी. ते आणि त्यांचे सहकारी हे पुरोगामी दृष्टीने व तत्त्वनिष्ठ भूमिकेने राजकारण जमेल तेवढे करावे या मताचे. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी बीड जिल्हा काँग्रेसचे ते अध्यक्ष होते व तिकीट वाटपात त्यांचा शब्द शक्यतो पाळला जाई. सर्व सहकाऱ्यांना तिकीटे देऊन स्वत: उभे राहावयाचे नाही असा त्यांनी अगोदर निर्णय घेतला होता. पण ज्या मतदारसंघात अर्जदारांपैकी कोणालाही तिकीट द्यावयाचे नाही असा हैदराबादला निर्णय झाला त्या अवघड मतदारसंघात वडलांना वरिष्ठांच्या आदेशामुळे उभे रहावे लागले. या निवडणुकीत त्यांचा व त्यांच्या अशाच काही निवडक मित्रांचा पराभव झाला व पुढेही संघटनेतून पद्धतशीरपणे स्वामीजी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना बाजूला सारण्यात आले. परंतु त्याची खंत त्यांनी कधी बाळगली नाही. लोकनिष्ठेचे राजकारण पुढच्या काळात अशक्य होईल हे दिसले तेव्हा ते राजकारणातून १९५६ च्या सुमाराला बाजूला झाले. तेही कोणतीही कटुता मनात न बाळगता. त्यांच्या या संयमित वर्तनाचाही माझ्या मनावर खोल परिणाम आहे.

कुटुंब जीवनात आणि सामाजिक जीवनात वडलांच्या मनात असलेली इतरांबद्दलची सहानुभूती व समतोल दृष्टी हा आम्हा भावंडांचा एक विशेष लाभ होता. त्यातले किती मी घेऊ शकलो हे मला माहीत नाही. कोणावरही रागावताना अगर किरकोळ गोष्टीबद्दल घरी तक्रार करताना मी त्यांना पाहिलेले नाही. इतरांनी आपल्यासाठी काय केले याचे स्मरण ठेवावयाचे व आपण त्यांच्यासाठी जे केले ते विसरून जावयाचे हे त्यांचे वागणे आम्हा कुणालाच तंतोतंत आत्मसात करणे अवघड आहे. पण ते पाहायला मिळाले हे माझे भाग्य.

वडलांचा आणखी एक मोठा विशेष म्हणजे त्यांचे वक्तृत्व. भाषणाचा उद्देश लोकांना आपले पांडित्य दाखविणे हा नसून एखादा विषय समजावून सांगणे हा असला पाहिजे असे त्यांचे मत. अतिशय सोपे, सरळ मुद्याला हात घालणारे व विषयानुरूप लोकांच्या परिचयाची उदाहरणे देणारे असे त्यांचे वक्तृत्व होते. तीन तीन हजार शेतकऱ्यांच्या सभेत हातात ध्वनिक्षेपक घेऊन व्यासपीठावर फेऱ्या मारीत कुळकायद्यातल्या अवघड बाबी अतिशय सोप्या करीत त्यांची होणारी भाषणे मी ऐकली आहेत. सार्वजनिक भाषण करण्याचा धीटपणा मला वडलांच्यामुळेच अगदी लहानपणी आला आणि माझ्या बोलण्यात जर काही चांगले असेल तर ते बहुतेक सारे माझ्या वडलांचे आहे.

*तुमच्या वडलांव्यतिरिक्त इतर कोणाचा तुमच्या मनावर विशेष संस्कार झाला असे तुम्हाला वाटते?*

आई, आजी यासारख्या कुटुंबातल्या व्यक्तींचे संस्कार तर झालेच. त्याशिवाय दोन व्यक्तींचा विशेष प्रभाव माझ्या मनावर पडला. एक म्हणजे अनंत भालेराव. अनंतरावांनी आणि सुशीलाबाईंनी मला त्यांच्या कुटुंबातलाच एक मानले. ध्येयनिष्ठा आणि मूल्यनिष्ठा ही आचरणात आणताना एखाद्या व्यक्तीला आणि कुटुंबाला किती कठीण अवस्थेतून जावे लागते हे मी अनंतरावांच्या घरात पाहत होतो. अनंतरावांचा महत्त्वाचा विशेष असा की त्यांनी स्वत:चा विचार करण्याऐवजी संस्थेचा आणि समाजाचा विचार नेहमी केला. सन्मानाची शक्यता निर्माण झाली त्यावेळी दुसऱ्यांची नावे पुढे केली आणि आपल्याकडे नम्र कार्यकर्त्याची भूमिका कायम ठेवली.

स्वातंत्र्याच्या लढ्यात फकिरी पत्करलेल्या बाबासाहेब परांजप्यांचेही माझ्या मनात कुठे तरी खोल आकर्षण आहे. तरुणांना पेटवणारे त्यांचे वक्तृव मी सरत्या बहराच्या काळात ऐकू शकलो. परंतु एखादे काम हाती घेतले म्हणजे सतत तोच ध्यास एखाद्याच्या मनात कसा असू शकतो हे बाबासाहेबांच्या रूपाने मी पाहिले. त्यांच्यासारखे अनासक्त अवधूत मला होता येणे शक्यच नव्हते. पण ते माझ्या आदराचे एक स्थान होते.

राजकारणात थोडा काळ असताना मला आकर्षण होते ते स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा खरा अर्थ आणि उद्देश ज्यांना कळाला होता अशा एसेम जोशींचे. विविध कारणांनी व प्रसंगांनी अण्णांच्या सहवासाची थोडीफार संधी मिळाली आणि माझ्या मनातले त्यांचे चित्र अधिकाधिक उजळत गेले. एवढ्या नितळ मनाचा माणूस कधी काळी राजकारणात होता हे पुढच्या पिढ्यांना पटणारसुद्धा नाही.

*तुमच्या मनात साहित्याबद्दलचे प्रेम कसे निर्माण झाले? कोणते संस्कार त्यासाठी कारणीभूत ठरले? साहित्याच्या स्वरूपाविषयी तुमची समज निश्चित होण्यासाठी कशाची मदत झाली?*

शाळेतल्या काही शिक्षकांनी शिकवताना जुन्या मराठी कवितेची आवड निर्माण केली होती. आठवी- नववीच्या वर्गात मराठी शिकवायला प्रभाकर पाटील आले. त्यांच्याकडे सत्यकथा येई. तेही वाचण्याची गोडी लागली. पाटलांच्या घरी काही नवी पुस्तकेही वाचायला मिळाली. नव्या मराठी कथेचा आणि कवितेचा ओझरता परिचय झाला. नंतर अमरावतीला गेलो तेव्हा कवींच्या गराड्यातच सापडलो. तुळशीराम काजे, मधुकर केचे हे तर विद्यार्थीच होते. पण विदर्भ महाविद्यालयात शिकवणारे भ.श्री. पंडित हेही नामवंत कवी होते. मी शिवाजी महाविद्यालयात असलो तरी त्या महाविद्यालयातल्या मराठीच्या वर्गाना कधी कधी बसे. कविता ऐकणे आणि कवितेविषयी बोलणे हाच या काळात महत्त्वाचा उद्योग होता. इंटर झाल्यावर बी.ए.ला औरंगाबादला आलो. त्र्यंबक महाजन तेव्हा युवक साहित्य मंडळ चालवित असत. पाच- दहा लेखक- कवी

मित्रांचे मुख्यत: नेहमी जमून वाङ्मयाविषयी आपापसांत बोलणारे हे मंडळ होते. महाविद्यालयाचा वेळ सोडला तर इतर वेळी त्र्यंबक महाजन आणि चंद्रकांत भालेराव यांच्याबरोबर लेखनाविषयी आणि इतर गप्पा मारणे हाच मुख्य कार्यक्रम होता.

मित्रांच्या बरोबर होणारे वाङ्मयाबद्दलचे बोलणे आमचा भाबडा उत्साह दर्शविणारे होते. मराठवाड्यातील लेखकांना फारसा वाव मिळत नाही व त्यांचे लिखाण चांगले असूनही त्याला प्रसिद्धी मिळत नाही असा आमचा त्या काळी दृढ विश्वास होता. आपल्यावर कुणी तरी अन्याय करीत आहे ही मनाची समजूत करून घेणे मन रमविण्यासाठी बरे होते. मराठीतले उत्तोमत्तम साहित्य वाचून त्यावर चर्चा करण्याऐवजी आपल्याच किंवा मित्रमंडळीच्या लिखाणाकडे लक्ष देण्याचे ते वय होते. प्रातिनिधीक कवितासंग्रह किंवा कथासंग्रह काढण्याचे मनसुबे करण्याचा तो काळ होता.

पाच- सहा महिन्यांत ही परिस्थिती पालटली. मिलिंद महाविद्यालयात प्राचार्य म.भि. चिटणीस मराठी शिकवित. त्यांच्या शिकविण्यातून नव्या मराठी कथेचा आणि नव्या मराठी कवितेचा थोडासा परिचय झाला. माणसाच्या बाह्यरूपाचाच नव्हे तर त्यांच्या अंतर्मनाचाही परिचय करून देण्याची वाङ्मयाची शक्ती परिचयाची होऊ लागली. महाविद्यालयाचे ग्रंथालय अद्यावत होते. तेथे मिळतील तेवढी पुस्तके वाचण्याचा मी सपाटा चालविला. मी औरंगाबादला आल्यानंतर वर्षभराने सुधीर रसाळ हैदराबादहून आला आणि त्याचा परिचय झाला. आम्हा मित्रांच्या गप्पात आणि चर्चात त्याचाही समावेश झाला. त्याचे वाचन चांगले होते. त्याच्या बोलण्यातून चांगल्या लेखनाचा सुगावा लागे आणि ते मिळवून वाचता येई. जी पुस्तके प्रसिद्ध होऊन पाच- सात वर्षे झाली होती. परंतु आमच्या हाती आली नव्हती अशी पुस्तके मिळवून मी त्याबाबत स्वत:ला अद्यावत करण्याचा प्रयत्न केला. गाडगीळ, गोखले भावे, माडगूळकर यासारखे कथाकार आणि बोरकर, करंदीकर, बापट, पाडगावकर यांच्यासारखे कवी त्यावेळी हाताशी लागले. माणदेशी माणसांच्यासारखी आम्हाला अपरिचित असलेली जीवनाची नवी रूपे आणि कोवळ्या भावनांना फुलविणाऱ्या 'जांभळाचे दिवस' सारख्या कथा त्या काळात प्रभावित करणे स्वाभाविक होते. त्या काळात सत्यकथेत प्रकाशित झालेल्या काही कथांनी लघुकथा या वाङ्मयाप्रकारचे सामर्थ्य दर्शविले. सत्यकथेत नवी कविता आली की ती चार- दोन वेळा वाचायची असा क्रम होता. महिमा लेखनाचा असो अगर काळाचा असो त्यातल्या अनेक कविता आजही माझ्या स्मरणात आहेत. १९५५-५७ हा काळ चांगले वाङ्मय काय असते हे कळून घेण्याचा माझा काळ होता. ललित लेखनाची चिकित्सा करावी, ते आपल्याला का आवडले हे तपासावे, त्याचे गुणदोष पाहावेत ही प्रक्रिया पुढे चिटणीसांचे आणि नंतरच्या काळात वा.लं.चे शिकविणे मला सांगत गेले.

वाङ्मयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास म्हणजे काय, भाषेला आणि वाङ्मयाला एक परंपरा असते आणि प्रतिभासंपन्न लेखक आपल्या लेखनाने त्या वाङ्मय प्रकाराला एक नवे बळ देतो, एक नवा आदर्श निर्माण करतो हे वा.लं.च्या शिकवण्यातून कळू लागले. वा.लं.नी वाङ्मयाकडे पाहायची दृष्टी दिली परंतु शेरेबाजीची सवय लावली नाही. आपली तयार मते त्यांनी आमच्यावर कधी लादली नाहीत. वाङ्मयातले नवे आणि जुने सारख्याच निर्लेप दृष्टीने पाहण्याची सवय विद्यार्थ्यांना लागावी असा त्यांचा प्रयत्न होता. त्यांचा हा संस्कार माझ्यासाठी फार मोठा लाभ होता.

एम.ए.ला असताना लाभलेले आणखी दोन शिक्षक म्हणजे भगवंतराव देशमुख आणि सुधीर रसाळ. भगवंतराव शब्दांच्या वापराबद्दल लेखनाच्या शुद्धतेबद्दल अतिशय काटेकोर असत. त्यांनी ज्ञानेश्वरीचा १२ वा अध्याय आम्हाला शिकविला. सामान्यत: जुने वाङ्मय काटेकोरपणे शिकविले जात नाही. भगवंतराव त्याला अपवाद. गोळाबेरीज अर्थ सांगून वेळ मारून नेणे असे त्यांनी कधीही केले नाही. अगदी अवघड वाटणारे शब्दही त्यांची व्युत्पत्ती सांगून त्यांनी सोपे केले. अर्थ आणि व्याकरण याबद्दल भगवंतरावांची आग्रही भूमिका भाषेचे पावित्र्य जपणारी असते.

रसाळांची आणि माझी मैत्री हा माझ्यासाठी एक मोठा ठेवा आहे. कोणत्याही वाङ्मयीन प्रश्नाबद्दल बोलताना वाङ्मयेतर विचार त्याच्या मनाला स्पर्शही करीत नाही. व्यक्तीजीवनात जे त्याच्याशी अप्रिय पद्धतीने वागले असतील त्यांनाही योग्य ते माप रसाळांमधला समीक्षक देतो. कोणत्याही तात्विक प्रश्नाबाबत बोलण्यासाठी आवश्यक तेवढा वेळ देऊन अभ्यास करण्याची त्याची तयारी असते. आपल्या विवेचनात काही चुकू नये यासाठी तो विलक्षण काळजी घेतो. अभ्यासाची शिस्त त्याने आपल्या विद्यार्थीदशेतच लावून घेतली असावी. कितीही सहवास असला तरी मित्राचे सर्व गुण आपल्यात येणे अशक्य असते. परंतु आपल्यात किती उणीवा आहेत हे कळण्यासाठी रसाळांच्यासारखा मित्र असावा लागतो.

*त्या काळात साहित्य परिषदेचे कार्य कसे होते? वाङ्मयाच्या प्रसिद्धीची कोणती साधने मराठवाड्यात होती?*

पोलिस कारवाईनंतर ३-४ वर्षांत साहित्य परिषदेचे काम जोराने सुरू झाले. मराठीच्या दृष्टीने हा पुनर्रचनेचा काळ होता. मराठी पाठ्यपुस्तके नव्हती. ती लिहिण्याचे काम काही शिक्षकांनी अंगावर घेतले. सरकारी नोकरीतला फार मोठा वर्ग उर्दू भाषिक होता. त्याला मराठी शिकविण्याची गरज होती. स्वातंत्र्यामुळे मराठीबद्दल उत्साहाचे वातावरण होते. साहित्य परिषदेने काही मराठी परीक्षा सुरू केल्या. त्यांना सरकारी मान्यताही मिळाली. मराठवाड्यात अनेक ठिकाणी परीक्षांसाठी वर्गही सुरू झाले. त्यांना मोठा प्रतिसाद होता. परिषदेच्या शाखा अगदी खेडोपाडी स्थापन झाल्या. या काळातच १९५३

साली परिषदेने आपले मुखपत्र म्हणून 'प्रतिष्ठान' मासिक सुरू केले. त्यात अनेक जुन्या मराठी लेखनाच्या संहिता प्रसिद्ध झाल्या. त्याबरोबरच नांदापूरकरांच्यापासून अगदी तरुण लेखकांपर्यंत मराठवाड्यातल्या अनेकांचे लेखन प्रसिद्ध होऊ लागले. येथील लेखकांना एक व्यासपीठ मिळाले ही मोठी घटना होती. या काळात मी शिक्षणासाठी अमरावतीत होतो. सुटीत इकडे आलो असताना 'प्रतिष्ठान'चे काही अंक मी बरोबर घेऊन जाई व तेथील लेखक मित्रांना ते दाखवून प्रतिष्ठानमध्येही तुम्ही लिहावे असे सांगत असे. त्यांनाही प्रतिष्ठानचे महत्त्व जाणवले असावे. तुळशीराम काजे, मधुकर केचे, मनोहर तल्हार, उद्धव शेळके, सुरेश भट, अशा विदर्भातील अनेक लेखक मित्रांचे लेखन प्रतिष्ठानने आवर्जून प्रसिद्ध केले आहे.

या काळात मराठवाड्यातील लेखकांना मिळालेले दुसरे वृत्तपत्र. ते अगोदर साप्ताहिक व नंतर अर्धसाप्तहिक होते. व्यासपीठ म्हणजे 'मराठवाडा' रविवारच्या मराठवाड्यात एक तरी कथा प्रसिद्ध होई. त्र्यंबक वसेकर, बा.या. कोरान्ने, श्रीकांत सदावर्ते, दिगंबर कुलकर्णी, तु.शं. कुलकर्णी आणि दा.गो. देशपांडे ऊर्फ सिनिक यासारखे अनेक कथाकार मराठवाड्याच्या अंकातून वाचकांसमोर आले. साहित्य परिषद, प्रतिष्ठान, मराठवाडा हे सर्व त्यावेळी हैदराबादला होते. राज्य पुनर्रचनेनंतर परिषदेचे कार्यालय औरंगाबादला आले. 'मराठवाडा' ही इकडे आला. परिषदेच्या कार्यकर्त्यांपैकी काही मंडळी औरंगाबादला आली. परंतु कहाळेकर, माढेकर वगैरे काही ज्येष्ठ मंडळी तिकडेच राहिली. परिषद औरंगाबादेत आल्यापासून माझा परिषदेशी संबंध आला. प्रारंभी काही महिने परिषदेची हैदराबादहून आलेली मंडळी येथील तरुणांना कसे सामावून घेतील याबद्दल किंतु होता. थोडासा परिचय झाल्याबरोबर मनातले हे अकारण गैरसमज निघून गेले. नंतर औरंगाबादेत आलेला माझा मित्र सुधीर रसाळ तर हैदराबादच्या सर्वांना पूर्वीपासून ओळखत होता. अनंत भालेराव परिषदेचे काम करण्यासाठी नव्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत. आम्ही दोघेही आणि चंद्रकांत भालेरावासारखे इतर मित्र परिषदेच्या कामाशी जोडले गेलो. जवळपास ३० वर्षे मी परिषदेच्या कार्यकारिणीवर निवडून येत होतो. पद महत्त्वाचे नाही, पडेल ते काम सर्वांनी करावयाचे हा अनंत भालेरावांचा दंडक आम्ही सर्वच पाळत होतो. परिषदेची शाखा स्थापन करण्यासाठी किंवा ह.ना. आपटे जन्मशताब्दीसारख्या कार्यक्रमांसाठी जिंतूर, माजलगाव अशा गावी बसने आणि बहुधा स्वखर्चाने जात होतो. परिषदेचे काम हा आमच्या आनंदाचाही भाग होता.

*तुम्ही काही काळ अध्यापनही केले. त्या काळातील तुमचे अनुभव कसे होते? अध्यापनाचे क्षेत्र तुम्ही का सोडले?*

१९५७- ५८ साली मी एक वर्षभर बीडला चंपावती विद्यालयात शिक्षक म्हणून काम केले. इयत्ता पाचवी ते सातवी व काही काळ १० वीचे मराठी मी शिकवित होतो. त्याचबरोबर आठवीचे हिंदीही. नवे शिकण्यासंबंधी बहुतेक विद्यार्थ्यांना कुतुहल असतेच. ते वाढवावे, त्यांना आवश्यक ते त्यांना भावेल, आवडेल अशा पद्धतीने शिकवण्याचा प्रयत्न शिक्षकाने करावयाचा असतो. हा प्रयत्न शिक्षकासाठी किती आनंददायी असतो याचा अनुभव मी घेतला. दर शनिवारी मी कवितेचा तास घेत असे. शाळा सुटण्यापूर्वीची ४५ मिनिटे मुले त्यांनी पाठ केलेल्या कविता म्हणत. क्वचित कवितांना चालीही लावीत. एखादे वेळी मी कविता समजावूनही सांगे. मुलांना आणि मलाही हा तास आवडत असे.

एम.ए. झाल्यावर लातूरच्या दयानंद महाविद्यालयात माझी प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. महाविद्यालयाचे पहिलेच वर्ष होते. सोमवारी २ तास, मंगळवार ते शनिवार १-१ तास असे आठवड्यात फक्त सात तासांचे अध्यापन असे. हिंदीचा अभ्यासक्रम सोपा असल्यामुळे महाविद्यालय सुरू झाले तेव्हा हिंदीला जास्त विद्यार्थी व मराठीला कमी असा प्रकार होता. परंतु हळूहळू हे चित्र बदलले. मराठी विषयाला पुढे जवळपास १७० मुले झाली व वर्गात उपस्थिती ९०- ९५ टक्क्यांपेक्षा जास्त असे. विद्यार्थ्यांपैकी लातूर शहरातील थोडी आणि ग्रामीण भागातील जास्त असत. त्यात सीमाभागातल्या मुलांचे प्रमाण मोठे होते. त्यापैकी बहुसंख्य मुलांच्या बोलण्यावर कानडी उच्चारपद्धतीचा प्रभाव होता. ही गोष्ट मी वा. लं.ना सांगितली तेव्हा त्यांनी 'चांगल्या शिक्षकाला अशा अडचणी हे एक आव्हान असते. या मुलांना मराठी वाङ्मयाची गोडी लावणे आणि भाषा व उच्चार समजावून सांगणे हे काम तू कसे करतोस यावर तुझे यश मोजले पाहिजे' असे सांगितले. या मुलांच्यापैकी बहुसंख्य मुले गरीब होती. पुष्कळांना खोलीच नव्हती. मोंढ्यात ओळखीच्या आडत्याच्या दुकानी त्यातली काही झोपत. सकाळी तेथेच बाहेरच्या सार्वजनिक नळावर आंघोळ आटोपत व रात्र पडल्यावरच पुन्हा आडत्याच्या दुकानी मुक्कामाला जात.

लातूरला ते पहिलेच महाविद्यालय. साहजिकच ते गावाचे सांस्कृतिक केंद्र झाले. वाङ्मयीन व सांस्कृतिक उपक्रमात महाविद्यालयाने त्यातही मराठीच्या प्राध्यापकाने पुढाकार घ्यावा अशी लोकांची अपेक्षा असे. खासगीरीत्या विद्यापीठाच्या परीक्षांना बसलेले गावातले प्रौढ विद्यार्थी शंका विचारण्यासाठी माझ्याकडे येत. सर्वांना प्राध्यापकांवर आपला अधिकार आहे असे वाटे. गाव व्यापारी असले तरी शिक्षण व संस्कृती याबद्दल आदर होता. बलभीम वाचनालय, राजस्थान विद्यालय येथेही अनेक सांस्कृतिक उपक्रम होत. राजस्थान विद्यालयातील राजाभाऊ उदगीरकर, वासुदेव बेंबळकर, जीवनधर शहरकर यासारखे अनेक शिक्षक माझे निकटचे स्नेही झाले. लातूरने माझ्यावर फार लोभ केला.

मराठी शिकविण्यात मी रमलो होतो. पण लातूर एका

वेगळ्याच कारणाने मला सोडावे लागले. लातूर शहरात तेव्हा पाणीपुरवठ्याची स्थिती अतिशय वाईट होती. नळाला अर्धा तास पाणी यायचे. त्यात पहिली पाच मिनिटे अक्षरश: चिखल येई. ते पाणी पिऊन माझे पोट बिघडे. अस्वच्छ पाण्याला त्यावेळी पर्यायही नव्हता. रोजच्या रोज तुरटी फिरवणे, पाणी उकळून घेणे, माझ्या दिनक्रमात बसणारे नव्हते. शेवटी लातूर सोडून मी औरंगाबादला गेलो. तेथे तीन- चार महिने मी कायदा शिकवला व वकिलीही केली आणि वकिलीच करायची तर वडलांच्या जवळ, जेथे घरचे दप्तर होते तेथेच करावी असे ठरवून मी बीडला गेलो. चुकला फकीर मशिदीत आला.

*तुम्ही आरंभी काही ललित लेखन केले. नंतर समाजकारण, कायदा इत्यादी वैचारिक स्वरूपाच्या लेखनाकडे तुम्ही वळलात. तुमच्या लेखनातले हे प्राधान्यक्रम बदलण्याची तुम्हाला काय कारणे जाणवतात?*

सुरुवातीला आठ- दहा कथा, तेवढयाच कविता मी लिहिल्या हे खरे आहे. कथांच्यापैकी एक- दोन बऱ्याही आहेत. परंतु त्यावेळचे कथालेखन आणि कविता लेखन आज वाचून पाहिले म्हणजे रचनेची सफाई वगळली तर त्यात फारसे काही नाही हे कळते. लेखनाच्या प्रारंभ काळात कथा आणि कविता हे वाङ्मय प्रकार बहुतेक जण हाताळतात. कदाचित लेखनाला तुलनेने सोपे, लवकर लिहिता येण्यासारखे आणि प्रसिद्धीही सोपी असलेले. त्यामुळे नवा लेखक त्यांच्याकडे वळत असावा. १९५६ च्या सुमाराला ‘किर्लोस्कर’चे एक पारितोषिक मला मिळाले. त्यानिमित्ताने संपादक असलेल्या मुकुंदरावांशी माझा पत्रव्यवहार सुरू झाला. मराठवाडा नव्यानेच महाराष्ट्रात येत होता. येथील वास्तवाविषयी बाहेरच्या मराठी वाचकांना कुतुहल होते. मुकुंदरावांनी मला अनेक निमित्तांनी लिहावयाला लावले. माझा मित्र सुधीर रसाळ ‘प्रतिष्ठान’च्या संपादक झाल्यानंतर ‘प्रतिष्ठान’ मध्येही मी एक किंवा अनेक पुस्तकांच्या निमित्ताने काही लेख लिहिले. मर्ढेकरांची कविता, सखाराम बाईंडर, यासारख्या काही चर्चाही झाल्या. ‘फेडाफेडी’सारख्या राजकीय उपहास असलेल्या लेखनाबद्दलही मी लिहिले.

एखादा ललित लेख वगळला तर माझे बहुतेक लेखन वाङ्मयचर्चेच्या स्वरूपाचे आहे. कधी संपादकांनी विषय सुचवला तर कधी मी विषय ठरवून त्यांची संमती घेतली. या काळात मी पुष्कळ लिहिले याचे बरेचसे श्रेय सुधीर रसाळ, मुकुंदराव किर्लोस्कर या संपादक स्नेह्यांना जाते. वेगवेगळे सामाजिक प्रश्न व मराठीतील चरित्रलेखन या दोन विषयांकडे या काळात मी वळलो. ललित लेखन हा आपला पिंड नाही हे लक्षात आल्याबरोबर मी ते सोडून दिले होतेच. मी वकिली करायला लागल्यानंतर आणि विशेषत: मी न्यायाधीश झाल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, कायदा ज्यांचे संरक्षण करण्यासाठी तयार केला जातो त्यांना तो समजावून सांगण्याची यंत्रणाच अस्तित्वात नाही. सामान्य माणसाच्या मनात कायद्याविषयी अनेक गैरसमज असतात. दुसरे म्हणजे वादी- प्रतिवादी, फिर्यादी- आरोपी, तपास करणारे पोलिस, वकील आणि न्यायाधीश या सर्वांच्या मनोभूमिकेच्या आणि मानवी स्वभावातील बऱ्यावाईट घटकांचा महत्त्वाचा संबंध प्रत्यक्ष न्यायदानाशी येतो. म्हणूनच कायदा जेवढा महत्त्वाचा तेवढाच न्यायदानाच्या प्रक्रियेतील माणसूही महत्त्वाचा आहे. यादृष्टीने मी विचार करू लागलो व त्यातून माझे बरेच लेखन झाले. सरकार कोणाचेही असले तरी समाजाचे बरेच प्रश्न अनुत्तरित राहतात व मूल्यांची घसरण चालूच राहते. या वास्तवाने मला सामाजिक प्रश्नांबद्दल स्फुटलेखन करण्यास प्रवृत्त केले. १९ व्या शतकातील सामाजिक विचारमंथन हाही माझा एक आवडीचा विषय. त्याबद्दलही मी बरेच लिहिले. आपल्या सामाजिक इतिहासाकडे तटस्थपणे पाहणे अवघड असले तरी आवश्यक आहे अशी माझी भूमिका आहे. ‘लोकसत्ता’, ‘सकाळ’ आणि ‘मराठवाडा’ यासारख्या वृत्तपत्रांच्या संपादकांनी मला स्तंभलेखन करण्याची संधी उपलब्ध करून दिली. या लेखनाला वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळत गेला.

*तुमच्या एकूण लेखनसंभारात ‘कर्मयोगी संन्यासी’ हे महत्त्वाचे पुस्तक. या विषयाकडे तुमचे लक्ष कसे गेले?*

स्वामी रामानंद तीर्थ यांच्या चरित्र लेखनाकडे मी योगायोगानेच वळालो. राज्य मराठी विकास परिषदेच्या वतीने महाराष्ट्राची जडणघडण करण्यात महत्त्वाचा वाटा असलेल्या निवडक लोकांची चरित्रे प्रसिद्ध करण्याचे ठरले होते. त्या मालिकेत ‘तुम्ही स्वामीजींचे चरित्र लिहाल का?’ अशी संस्थेच्या तत्कालीन प्रमुख सरोजिनी वैद्य यांनी विचारणा केली. मी त्याला होकारही दिला. पुढे स्वामीजींच्या चरित्राची साधने गोळा करू लागलो व अभ्यासही सुरू केला तेव्हा असे लक्षात आले की, स्वामीजींचे विस्तृत चरित्र लिहिले जाणे आवश्यक आहे. आपण ते काम करावे असे माझ्या मनाने घेतले. मोठे चरित्र लिहित असल्यामुळं शंभर पानी चरित्राच्या त्या मालिकेत आपण लिहू नये असा मला निर्णय घ्यावा लागला.

स्वामीजींचे चरित्र आपणच लिहावे असे वाटण्याची काही कारणे होती. माझे वडील स्वामीजींचे सहकारी. स्वामीजींचे नेतृत्व व स्वातंत्र्यलढा हा आमच्या घरात बोलला, अनुभवला जाणारा विषय होता. लढ्याचे अनेक नेते मी पाहिलेले होते. संघर्षाचे काही चटके आमच्याही घराला बसले होते. बऱ्याच घटना आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळातल्या राजकीय उलथापालथी याही माहीत होत्या. दुसरीही एक जमेची बाजू होती. मी उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असल्यामुळे शासकीय अभिलेखागारांचे दरवाजे माझ्यासाठी अधिक सुलभतेने उघडले जाण्याचा संभव होता. या दोन्हीमुळे कागदपत्रे आणि आठवणीतला इतिहास मला उपलब्ध होत गेले.

सुमारे सहा वर्षे मी या चरित्रासाठी काम केले. स्वामीजींच्या जीवनाचा सगळा कालखंड आपणच जगतो आहोत असे मला वाटत होते. विलक्षण आनंद देणारा हा अनुभव होता. शक्य

तो माणसांच्या स्मृतींवर न विसंबता कागदपत्रातील नोंदीवर अधिक विश्वास ठेवायचा व लेखी नोंद किंवा तोंडी स्मरण दुसऱ्या सामुग्रीशी ताडून पहावयाचे असे धोरण मी अवलंबिले होते. इतिहास घडविण्याचे कार्य नियती ज्या माणसांच्या हातून करते त्यांचे साधार चरित्र हा एक साधनग्रंथ असतो. हैदराबाद संस्थानचे विसर्जन, संयुक्त . महाराष्ट्राची निर्मिती, तेलंगणच्या भयभीत जनतेला निर्भय करण्याचा प्रयत्न अशा अनेक क्षेत्रांत स्वामीजींचे कार्य सतत स्मरण ठेवावे असे आहे. या स्मरणाचे साधन उपलब्ध करून देण्याचे काम माझ्या हातून झाले याचे मला मोठे समाधान आहे.

*चरित्र या वाङ्मय प्रकारासंबंधी तुमची भूमिका विस्ताराने सांगाल का?*

गेल्या दीडशे वर्षांतली मराठी पुस्तके आपण पाहिली तर चांगली आणि महत्त्वाची चरित्रे व आत्मचरित्रे फार कमी आहेत असे आपल्याला दिसते. आजूबाजूच्या वास्तवातून व्यक्ती घडली जाते आणि कर्तबगार व्यक्ती आपल्या आजूबाजूचे जीवन घडविण्याचा प्रयत्न करते असे आपण मानतो. माणूस जन्मत:च काही आवरणे बरोबर घेऊन येतो. त्याचे कुटुंब, त्याचे गाव, त्याची जात अगर धर्म, त्याचा देश, त्याची भाषा, त्याची संस्कृती एवढेच काय तेथला भूगोल आणि इतिहास या सर्वांनी एका अर्थाने व्यक्तीला बांधून टाकलेले असते. एखादे दुबळे झाड वाऱ्याने कलंडू नये म्हणून त्याला एखाद्या कामटीला बांधून टाकतात तसा या गोष्टी माणसाला थोडाफार आधार देतात, पण त्याच्या जगण्याची दिशाही निश्चित करून टाकतात. एक चाकोरी आखून देतात. काही माणसे आपण या सर्वांचे गुलाम नाही असे मानतात. ही परिस्थिती आपण बदलू शकतो असे त्यांना वाटते. काही वेळा समाजातील परिवर्तनाची गरज अशा एखाद्या माणसाला निमित्त करते आणि तो अशा बदलाचा ध्वज खांद्यावर घेतो. परिस्थिती आणि माणूस यांचा हा संबंध लक्षात घेतला म्हणजे चरित्र - आत्मचरित्राचे समाजाच्या इतिहासातील स्थान सहज पटू शकते.

आपल्या इतिहासात इतिहास घडवणाऱ्या व्यक्तींचे सुद्धा व्यक्तीजीवन आपण पुरेसे जतन केलेले नाही. महत्त्वाच्या माणसांच्या आयुष्यातले महत्त्वाचे निर्णय केवळ बाह्य परिस्थितीच्या आकलनाने ठरतात की त्याच्या मनाची ठेवण आणि कुटुंबातील ताणतणाव यांचाही काही संबंध कित्येक वेळा अशा निर्णयाशी असतो? इतिहास काळातील सोडा परंतु अगदी अलीकडच्या काळातील व्यक्तीविषयक नोंदी आपल्याकडे उपलब्ध नसतात. एका व्यक्तीला काही महत्त्व नाही हे आपल्या अध्यात्माने आपल्याला सांगितले ते व्यक्तीचरित्रांच्याबद्दलही आम्ही लक्षात ठेवले असावे. व्यक्ती- व्यक्तीतले पत्रव्यवहार, घटनांच्या काटेकोर नोंदी एवढेच काय, पण महत्त्वाच्या घटनांशी संबंधित स्थळेसुद्धा आम्ही जतन करून ठेवली नाहीत. महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचे सांगतो, विठ्ठल रामजी शिंद्यांचे साधार चरित्र अगदी अलीकडे लिहिले गेले. त्यानंतरच्या कालखंडातील अनेकांची चिकित्सक चरित्रे उपलब्ध नाहीत. शंकरराव देव, एसेम. जोशी, यशवंतराव चव्हाण यांचीही चिकित्सिक चरित्रे उपलब्ध नाहीत.

चरित्र लेखनात येणारा आणखी एक मोठा अडथळा म्हणजे आपल्याला लागलेली विभूतिपूजनाची सवय. कितीही मोठा असला तरी माणूस हा माणूस असतो हे चरित्रलेखकाला आणि बहुसंख्य वाचकांना मान्यच असावे लागते. शंभर चांगल्या गोष्टी करणाऱ्या माणसाच्या हातून एखादी चूक घडू शकते, माणसाच्या काही दुबळ्या जागा असू शकतात हे सर्व समाजाला मान्य असले तर चिकित्सक चरित्रांच्या निर्मितीला अनुकूल वातावरण होईल.

चिकित्सक चरित्र लिहिणारा लेखक निर्भिड तरीही संयमी लागतो. सार्वजनिक जीवनात ज्याचे महत्त्व नाही असे तपशील मुद्दाम शोधून चरित्र रंजक बनवायचे हा मोह त्याला टाळावा लागतो. चरित्रनायकाच्या हयात असणाऱ्या निकटवर्तीयांच्या भावना विनाकारण डिवचणारे खरेखोटे तपशील काही वाचकांचे विकृत कुतुहल शमविण्यासाठी चरित्रात घालणे हे अनुचित आहे. लेखकाचा निर्भिडपणा आवश्यक आहे तो चरित्र नायकाच्या सार्वजनिक जीवनात त्याच्या हातून घडलेल्या चुका सांगताना. अशा काही चुका माणसाचे मोठेपण एकदम नष्ट करीत नसतात. आपल्याकडे लिहिली जाणारी अनेक चरित्रे गोळाबेरीज पद्धतीने, सांगितलेल्या स्तुतीपर मजुकराने भरलेली असतात. कित्येक वेळा अशा चरित्रातूनच चरित्रनायकसुद्धा नीट उभा राहत नाही.

साधार चरित्रलेखन करणाऱ्याला त्यासाठी भरपूर परिश्रम करण्याची तयारी असावी लागते. सरकारी दप्तरातील कागदपत्रे, खासगी संग्रहातील नोंदी, समकालीन वृत्तपत्रांतील वृत्तांत इतर चरित्रे, आत्मचरित्रातील संदर्भ हे सर्व त्याला तपासावे लागते. दुसरे म्हणजे त्या कालखंडातील घटनांचा संदर्भासह अर्थ समजून घेण्याची त्याची कुवत असावी लागते. शिवाय चरित्रलेखनाचा उद्देश, तो काळ, ती व्यक्ती समजून घेणे हा म्हणजे सत्यशोधनाचा असावा लागतो. अशी चरित्रे त्या काळाच्या इतिहासाची महत्त्वाची साधने ठरतात. जे चरित्राला लागू आहे तेच आत्मचरित्रालाही लागू आहे. चरित्रापेक्षा आत्मचरित्र अधिक अवघड. कारण दुसऱ्याकडे पाहण्यापेक्षा स्वत:कडे पाहणे केव्हाही जास्त कठीण असते. आत्मचरित्र लिहिताना आपल्या वर्तनाचे समर्थन करण्याकडे स्वाभाविकच कल होतो. आपली बाजू लेखक मांडणारच. फक्त जेथे चुकले तेथे ते कबूल करण्याचे धैर्य हवे.

*मराठवाडा हे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे केंद्र होते. आधुनिक काळात मराठवाड्यात भरघोस वाङ्मय निर्मिती का होऊ शकली नाही?*

यादवांच्या काळापासून मराठवाडा हे मराठी संस्कृतीचे

केंद्र होते. लोकभाषा असलेल्या मराठीला काही काळ तरी सत्तेचा आश्रयही लाभला होता. महानुभाव पंथ, वारकरी पंथ आणि रामदासी पंथ याचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने मराठवाड्यात होते. या पंथांचे वाङ्मय येथे मोठ्या प्रमाणावर लिहिले गेले. गुलबर्ग्याजवळचे मळखेड आणि लातूर या भागांत राष्ट्रकुटांच्या काळापासून जैन संस्कृतीची केंद्रे होती. जैन मराठी वाङ्मयही या भागात लिहिले गेले. निदान १६ व्या शतकापर्यंत तरी धर्माश्रित संस्कृतीचे व तिचे अभिव्यक्ती असलेल्या मराठी वाङ्मयाचे केंद्र मराठवाड्यातच होते. विविध पंथांचे मठ हे उपासकांचे निवासस्थान आणि पूजास्थान याबरोबरच वाङ्मयाचेही आश्रयस्थान झाले. १७ व्या शतकापासून संस्कृतीचा मराठवाड्यातील हा मध्यबिंदू पश्चिम महाराष्ट्रात सरकरण्याला सुरुवात झाली. १८ व्या शतकात पश्चिम महाराष्ट्र सांस्कृतिक घडामोडींच्या केंद्रस्थानी आला. या शतकात मराठवाड्यात राजकीय अस्थिरता होती. निजामाच्या राजवटीत मराठीला आश्रय मिळणे दूरच, उर्दू राजभाषा करून मराठवाड्यावर लादण्यात आली व मराठी संस्कृतीची पिछेहाट होऊ लागली. स्वाभाविकच १७ व्या शतकापासून मराठवाड्यातील मराठी वाङ्मय निर्मिती कमी झाली.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रात आल्यापासून काही महत्त्वाचे बदल मराठी वैचारिक जीवनात झाले. इंग्रजी शिक्षणाचा एक परिणाम म्हणून व्यक्तीस्वातंत्र्य आणि समता अशी मूल्ये सुशिक्षितांच्या मानसात रुजू लागली. आपली धर्मस्थिती, समाजस्थिती आणि राजकीय परिस्थिती यांची चिकित्सा करण्यात येऊ लागली व एक मोठे विचारमंथन महाराष्ट्रात झाले. वृत्तपत्रे आणि विशिष्ट उद्दिष्टासाठी निर्माण झालेल्या सार्वजनिक संस्था यांच्यामार्फत होणारे वादविवाद, विचारांनी प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष घेतलेले वाङ्मयरूप अशा विविध माध्यमातून एक संवाद सुरू झाला. हे सर्व विचारमंथन अर्थातच मराठी भाषेतून होत होते. त्याचा एक परिणाम मराठी गद्य सशक्त होण्यात झाला. याचा दुसरा परिणाम आमच्या वाङ्मयावरही झाला. निबंधासारखा नवा वाङ्मय प्रकार जन्माला आला. कवितेने नवे वळण घेतले. लौकिक व्यक्तीभावना आणि सामाजिक आशय यांना तिच्यात स्थान मिळाले. कथा- कादंबऱ्या सामाजिक वास्तवाकडे वळल्या. दुर्दैवाने या सर्व विचारमंथनातून आणि वाङ्मयीन परिवर्तनाच्या प्रक्रियेतून मराठवाडा वगळला गेला होता. निजामाच्या अमलाखाली मराठवाड्याचा त्यात कोणताच सहभाग असणे शक्यच नव्हते. जे मुंबई- पुण्यात घडत होते त्यापैकी फारच थोडे प्रतिध्वनीच्या स्वरूपात मराठवाड्यात ऐकू येई. एखाद्या उपग्रहाने मोठ्या ग्रहाच्या भोवती अंतर राखून फिरावे असे या काळात मराठवाड्याचे मानस झाले.

स्वातंत्र्यानंतर मराठवाड्याचे सांस्कृतिक वातावरण मोकळे झाले. परंतु एखाद्या अंधार कोठडीत बराच काळ राहिल्यानंतर बाहेर आल्याबरोबर प्रकाशाने दिपून जावे तसे मराठवाड्यातील वाङ्मय विश्वाचे झाले. कोणत्याही श्रेष्ठ लेखकाच्या लेखनाचा प्रभाव इतर काही लेखकांवर पडतोच तसे इकडेही झाले. त्यातच पश्चिम महाराष्ट्रातल्या खुलेपणाची परंपरा असलेल्या सांस्कृतिक जीवनाचे आकर्षणही मराठवाड्यातील लेखकांना वाटणे स्वाभाविक होते. बी. रघुनाथांसारखे काही लेखक मात्र याला अपवाद होते. आपल्या वाट्याला आलेल्या जीवनातही वाचकांना सांगण्यासारखे पुष्कळ आहे याचा त्यांना विश्वास होता. त्यांच्या मनात न्यूनगंड नव्हता. आपल्या अनुभवाशी त्यांच्या लेखनाने राखलेले इमान हे त्या लेखनाच्या श्रेष्ठतेचे एक महत्त्वाचे कारण होते. मराठवाड्यात भरघोस वाङ्मय निर्मिती झाली नाही आणि दर्जेदार लेखनही कमी झाले. याचे एक कारण लेखकांना आपले सच्चे अनुभव वाङ्मयरूप घेऊ शकतात याबद्दलचा आवश्यक आत्मविश्वास नव्हता हे असावे. लेखकाचा आपल्या अनुभवाबद्दलचा आणि तो सांगण्यासारखा आहे याबद्दलचा विश्वास हा अनेक कारणांनी कमी किंवा अधिक होऊ शकतो. त्याची फक्त ढोबळ स्वरूपाची कारणमीमांसा करता येते. केशवसुतांनी कवीच्या आणि कवितेच्या सामर्थ्याबद्दल जो आत्मविश्वास प्रकट केला आहे तो त्या काळातील वैचारिक मंथनाचा एक परिपाक होता. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने दलित माणसांना एक आत्मभान दिले. त्यानंतर जे दलित वाङ्मय निर्माण झाले त्यामागे आंबेडकरांच्या चळवळीने त्यांना दिलेला आत्मविश्वास हे एक महत्त्वाचे कारण होते. अशी आणखीही उदाहरणे सांगता येतील. गेल्या काही दिवसांत मराठवाड्यातील लेखक जे विविध प्रकारचे अनुभव विशेषत: कविता आणि कादंबरी या माध्यमातून व्यक्त करीत आहेत त्यामागे त्यांचा वाढलेला आत्मविश्वास हेही कारण असावे.

*अलीकडच्या काळात मराठवाड्यात मोजकेच लक्षणीय लेखक उदयाला आले. हे प्रमाण महाराष्ट्र आणि विदर्भाच्या तुलनेत कमी आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी काय करता येईल?*

एखाद्या काळात एखाद्या किंवा सर्वच वाङ्मय प्रकारात फारसे चांगले लेखन होत नाही असा काळ वाङ्मयीन इतिहासात येऊन जातो. तसेच एखाद्या प्रादेशिक विभागात इतरांच्या तुलनेने कमी लिहिले जाते असेही अनेक वेळा दिसते. या सर्वांची निश्चित कारणमीमांसा करता येत नसते. परंतु काही अंदाज बांधता येतात.

गेल्या १५- २० वर्षांत महाराष्ट्राच्या इतर भागाच्या मानाने आपल्याकडे लक्षणीय लेखन संख्येने कमी झाले. त्याची अगदी नक्की कारणे सांगता येणे अवघड आहे. आपल्या सांस्कृतिक पिछेहाटीच्या परिणामांची चर्चा आपण केलीच आहे. तेही कारण अद्याप मराठवाड्यात रेंगाळत आहे. एकंदर वैचारिक जीवनातील उदारता, विविध समाजघटकांचे एकमेकांशी असलेले सौहार्द आणि वाङ्मयबाह्य निकषांना बाजूला सारून

लेखनाचे स्वागत करण्याची वाचकांची तयारी यांचाही ललित लेखनावर थोडाफार अनुकूल परिणाम होतो. अशी अनुकूल परिस्थिती नसेल, वातावरण ढगाळ असेल तेव्हा काही पिकांवर अनिष्ठ परिणाम होणे स्वाभाविक असते.

१९४५- १९६५ या वीस वर्षांतील एकूण मराठी ललित लेखनाचा आपण विचार केला तर उत्तमोत्तम कवी आणि कथाकार या कालखंडात लिहू लागले, वाचकांसमोर आले, असे आपल्याला दिसते. त्या तुलनेने गेल्या दहा वर्षांत अशा लक्षणीय लेखनाची संख्या कमी दिसते. त्याची कारणे अनेक असू शकतील. पण अशा कारणांची चर्चा करताना प्रतिभेच्या निरंकुशतेचे स्मरण आपण ठेवले पाहिजे. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत चांगला लेखक जन्मूही शकतो आणि अत्यंत अनुकूल परिस्थितीतसुद्धा चांगले लेखन होत नाही असेही आपल्याला दिसते. चांगले ललित लेखनही प्रयोगशाळेत नियंत्रित तपमानात जन्माला येणारी गोष्ट नाही.

या चर्चेचा अर्थ असा मात्र नाही की काही चांगले लेखन होतच नाही. असे कोणत्याच काळात आणि कोणत्याच प्रदेशात घडत नसते. काही चांगली कविता मराठवाड्यातही लिहिली गेली. आपल्या नाटककारांची नाटके महाराष्ट्रात रसिकांना भावली. काही कादंबऱ्यांनी आपले लक्ष वेधून घेतले. अर्थात असे लेखन यापेक्षा अधिक झाले पाहिजे.

*मराठवाड्यात गेली ४५ वर्षांपासून विद्यापीठीय शिक्षण उपलब्ध आहे तरीही विविध ज्ञानशाखांत आणि वैचारिक क्षेत्रात मराठीतून फारसे लिहिले गेले नाही, असे का? आणि ही स्थिती बदलण्यासाठी काय केले पाहिजे?*

विद्यापीठीय शिक्षणाचा आणि वैचारिक लेखनाचा जो संबंध तुम्ही गृहित धरला आहे तो आजच्या काळात उरलेला नाही. शिक्षण हे वैचारिक जागृतीचे व्यक्तीची गुणवत्ता वाढविण्याचे आणि सामाजिक प्रगतीचे साधन आहे ही जाणीव लुप्त होऊन शिक्षण संस्था या काही व्यक्तींना रोजगार मिळवून देण्याचे साधन आहे ही भूमिका स्वीकारली की, वैचारिक विश्वापासून शिक्षण संस्था दूर जाणार हे उघड आहे. अर्थात ही स्थिती फक्त मराठवाड्यातच झालेली नाही. देशभर ही स्थिती कमीअधिक प्रमाणात आहे. अर्थात जेथे सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरा क्षीण झालेल्या असतात तेथे ही अवनती अधिक तीव्रतेने जाणवते. नवे विचार झाले नाहीत आणि शिक्षण आणि वैचारिक विश्व यांचा संबंध जर शिल्लक राहिला नाही तर पुढच्या अनेक पिढ्यांचे नुकसान होते हे समाजाचे नेतृत्व करणाराना कळले पाहिजे. विद्यापीठात किंवा एखाद्या महाविद्यालयात अयोग्य व्यक्तीला नेमणे म्हणजे आपल्याच मुलाबाळांच्या अहिताची तरतूद करणे आहे हे जर कळत नसेल तर शिक्षण संस्थांकडून अधिक अपेक्षा काय करणार? अपवाद वगळले तर शिकवणारे स्वत:च काही वाचीत नाहीत आणि फारसे शिकवितही नाहीत. अशी स्थिती असेल तर विविध ज्ञानशाखांतील नव्या संशोधनाचे आणि विचारमंथनाचे केंद्र शिक्षण संस्था व्हाव्यात ही अपेक्षा कशी करता येईल?

विविध ज्ञानशाखांत वैचारिक लेखन होत नाही याचे एक महत्त्वाचे कारण असे की समाजाच्या प्रगतीसाठी विचारांची आवश्यकता आहे असे आजचे नेतृत्व मानतच नाही. समाजाला नवे विचार शिकवावे, माणसाची मने विशाल करावीत, परिर्वतनाचा आधार विचार हा असावा व वैचारिक विश्व उदारतेच्या पायावर उभे असावे, असे मानले गेले तरच विचारांना समाजात स्थान राहील. आमचे राजकारण आणि समाजकारण यांच्यातील वैचारिक प्रक्रियेचे स्थान जर कमी कमी होत गेले तर नवे वैचारिक लेखन फारसे होणारच नाही. समाजाची मानसिकता तयार करण्यात विचारांचे महत्त्व तर आहेच. शिवाय लोकशाही व्यवस्थेत समाजाच्या भौतिक प्रगतीशीसुद्धा विविध ज्ञानशाखातील तज्ज्ञांच्या विचारांची मदत आवश्यक असते. आमची शासनव्यवस्था व शैक्षणिक संस्थातील तज्ज्ञ यांचाही आपण संबंध वाढवलेला नाही. समाजाचे आपण काही देणे घेणे लागतो असेच शैक्षणिक जग मानत नाही. परिणामत: अभ्यासक्रमापुरातच विचार केला जातो. व्यापक प्रश्नासंबंधी विचार करण्याची परंपरा निर्माण होत नाही. अर्थात हे फक्त मराठवाड्यात आहे असे म्हणणे बरोबर नाही. ही परिस्थिती बदलण्याला दीर्घ काळ लागेल आणि उदारमतवादी लोकशाही जीवनपद्धती एक मूल्य म्हणून मनात रुजवावी लागेल. ते एक अवघड आणि दीर्घकाळ करावे लागणारे काम आहे.

*आता एक निमराजकीय प्रश्न. हैदराबादेतला जुलूम पुष्कळसा धर्माच्या नावावर होत होता. तुमच्यावर लहानपणी त्याचाही परिणाम झाला असणार. तरीही तुम्ही समाजवादी विचाराकडे कसे आकृष्ट झाला?*

शासक मुस्लिम आणि जुलूम होणारी बहुसंख्य जनता हिंदू असे असतानाही हैदराबादचा लढा धर्मातीत राहिला याचे श्रेय गांधीजींचे मार्गदर्शन आणि स्वामीजींचे नेतृत्व यांनाच आहे. सरंजामदारी आणि लोकशाही यांच्यातला लढा धार्मिक होऊ नये याची पुरेपूर काळजी दोघांनीही घेतली. लढ्याशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या, परंतु त्याचे शेवटचे पर्व पाहण्याची संधी मिळालेल्या माझ्यासारख्यांच्या मनात त्यामुळेच धर्म आणि लोकशाही यांची गल्लत झाली नाही.

मी महाविद्यालयात गेलो त्यावेळी लोकशाही समाजवादाचा विचार मांडणारे नेते महाराष्ट्रात तरुण वर्गात लोकप्रिय होते. मी नाशिकला असताना राष्ट्र सेवा दलात जाऊ लागलो. पुढे बीडला मीही सेवादलाची शाखा काही दिवस चालवली. समाजवादी नेत्यांच्या साध्या राहणीचे, नि:स्वार्थ वृत्तीचे व समतेच्या विचारांचे मला आकर्षण होतेच. औरंगाबाद आणि लातूर या दोन्ही ठिकाणी समाजवादी विचारांच्या मित्रवर्तुळात मीही राहत होतो. माझ्यावर विशेष प्रभाव पडला तो एसेम

जोशींचा. लोकशाही व्यवस्थेतही सविनय संघर्षाच्या मार्गाने समतेचा विचार अंमलात आणता येईल, असा विश्वास एसेममुळे निर्माण झाला. सामान्य माणसावर श्रद्धा असलेला आणि निवडणुकीत त्याने आपला पराभव केला तरी त्याचे मन समजून घेणारा आणि त्याच्यासाठी काम करणे चालू ठेवणारा एसेमसारखा नेता निर्माण होणे अवघड आहे.

*प्राज्ञ पाठशाळा वाई, कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिक, राजवाडे संशोधन संस्था, धुळे, मराठवाडा साहित्य परिषद अशा संस्कृती आणि संशोधन यात गुंतलेल्या संस्थांशी तुमचा संबंध आहे. अशा संस्थांच्या कामकाजाविषयी तुमचा काय अनुभव आहे?*

महाराष्ट्रातल्या अशा काही महत्त्वाच्या सार्वजनिक संस्थात काम करण्याची संधी मिळाली ही माझ्या भाग्याची गोष्ट आहे. प्राज्ञ पाठशाळा ही सुमारे ८० वर्षांची परंपरा असलेली जुनी संशोधन संस्था आहे. नवभारतसारखे वैचारिक लेखन प्रसिद्ध करणारे मासिकही संस्था चालवते. सर्व धर्माभ्यासकांना उपयुक्त होईल असा धर्मकोश करण्याचे काम साठ वर्षांहून अधिक काळ चालू आहे. आवश्यक तसे संस्कृत जाणणारे पुरेसे अभ्यासक मिळत नाहीत व शासन आणि जनता यांच्याकडून होणारी मदत अपुरी असते यामुळे या कामाला अधिक गती येऊ शकत नाही. गंभीर वैचारिक आणि शास्त्रीय स्वरूपाचे लेखन करणारे लेखक कमी झाले आहेत आणि पुरेसे ग्राहकही 'नवभारत'ला मिळत नाहीत. असे काही प्रश्न आहेत. कुसुमाग्रजांचे स्मारक उभे राहते आहे आणि कुसुमाग्रजांना प्रिय असलेल्या कामासाठी या वास्तूचा उपयोग अधिकाधिक व्हावा असा विश्वस्तांचा प्रयत्न आहे. 'जनस्थान' व 'गोदावरी' पुरस्कारासारखे उपक्रम मराठी सांस्कृतिक जीवनातील कार्याची दखल घेत असतात. या संस्थेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे एकोप्याने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच या संस्थेला लाभला आहे. मराठवाडा साहित्य परिषदेची वास्तू पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. परिषदेच्या कार्याला अधिक गती येण्याची चिन्हे आहेत. राजवाडे संशोधन मंडळात संशोधनाचे काम अधिक गतीने झाले पाहिजे व त्यासाठी नवनवे संशोधक संस्थेला लाभले पाहिजेत. अशा सांस्कृतिक आणि वाङ्मयीन संस्थांमध्ये अडचणी अनेक असतात. परंतु समाजात आस्था कायम असेल तर त्यावर मात करता येते.

*साहित्य संमेलनाचे आजच्या स्वरूपाविषयी तुम्हाला काय वाटते? तुम्ही कोणत्या सूचना कराल?*

साहित्य संमेलनाचे स्वरूप हा नेहमी आपल्या चर्चेतला विषय असतो; परंतु संमेलनाच्या स्वरूपात फारसा बदल करण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न होत नाही. एखाद्या चांगल्या लेखकाचा निवडणुकीत पराभव झाला म्हणजे अध्यक्षीय निवडणुकीची पद्धत बदलावी असे सर्वांनाच वाटते. संमेलनाचे सर्व भूतपूर्व अध्यक्ष आणि साहित्य संस्थाचे दोन- दोन प्रतिनिधी अशा छोट्याशा समितीने अर्ज न मागवता अध्यक्षाची निवड करावी अशीही सूचना करण्यात आली होती. परंतु ती मान्य झालेली नाही.

राजकारणी मंडळी साहित्य संमेलनाला वर्ज्य असण्याचे कारण नाही. राजकारणातील अनेक लोक चांगले वाचक आणि लेखकही असू शकतात, असतात. संमेलनाला समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रातील लोकांनी यावे तसेच राजकारणातल्या लोकांनीही यायला हरकत नाही. राजकारणातले काही लोक काही साहित्य संमेलनाला आपले सत्तापद विसरून श्रोते म्हणून हजर राहिलेले मी पाहिलेले आहेत. संमेलनाध्यक्ष आणि इतर लेखकांचा योग्य तो मानही त्यांनी राखलेला आहे. काही वेळा आपणच तारतम्य विसरतो त्याला राजकारण्यांचा काय इलाज आहे?

संमेलने खर्चिक झाली अशी तक्रार नेहमी केली जाते आणि ती खरी आहे; पण ती खर्चिक कोणी केली? आम्हीच आमच्या सवयी बदलल्या. पूर्वी संमेलने साधी होती. त्या त्या ठिकाणच्या गृहिणी स्वत: खपून पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था करीत. मंडपसुद्धा साधे असत. प्रतिनिधी शाळांमध्ये उतरत. औरंगाबादला झालेल्या सत्तावन्न सालच्या संमेलनात दत्तो वामन पोतदार सार्वजनिक नळाखाली आंघोळ करीत असताना आणि हैदराबाद संमेलनात मान्यवर साहित्यिक एका शाळेत सतरंजीवर वळकट्या पसरून झोपलेले मला आठवतात. अपवाद वगळता प्रवास खर्च देण्याची फारशी पद्धत नव्हती. संमेलन ही वाङ्मयाविषयी विचार करण्याची आणि आपल्या वाचकांना भेटण्याची एक संधी आहे असे चांगले आणि प्रसिद्ध लेखकसुद्धा मानीत. आता लोकांना माहीत असलेले अनेक लेखक संमेलनाकडे मुद्दाम बोलावल्याशिवाय फिरकतही नाहीत.

प्रादेशिक संमेलने तर घरगुती वातावरणात व्हायची. पाहुणेही आयोजकांच्या अडचणी ओळखत. त्यामुळे संमेलन फार कमी खर्चात होई. छोट्या गावात संमेलन झाले तर तेथे चांगले हॉटेल कुठून आणणार? पाहुणेही कोणाच्या तरी घरी उतरत. संमेलनाचा आकार लहान असल्यामुळे गंभीर विषयावरही चांगली अभ्यासपूर्ण चर्चा परिसंवादात होऊ शके. जालना संमेलनातील 'मराठी साहित्य पुरेसे प्रक्षोभक आहे काय' या विषयावर झालेला परिसंवाद आणि 'परंपरा आणि नवता' या विषयावर बीडच्या साहित्य संमेलनात झालेला परिसंवाद एक वेगळीच उंची गाठणारे होते. असे आणखीही करता येऊ शकेल. संमेलनात होणारी पुस्तक विक्री वाढत आहे आणि ग्रामीण भागातला तरुण संमेलनाकडे वळतो आहे ही आनंदाची गोष्ट आहे. संमेलनाला येणाऱ्या लोकांची संख्या झपाट्याने वाढते आहे. गर्दी वाढली तरीही संमेलनाचा खर्च कसा आटोक्यात ठेवता येईल याचा विचार झाला पाहिजे.

संमेलनाचा उद्देश वाचकांना मराठी साहित्याकडे वळविणे, साहित्याविषयीची आवड आणि अभिरुची निर्माण करणे, मातृभाषेच्या महत्त्वाचे पुन्हा एकदा स्मरण देणे, वाचन संस्कृतीला बळ देणे हा आहे, याचे स्मरण आपण सतत ठेवले पाहिजे.

परिसंवादाचे विषय असोत अगर इतर कार्यक्रम असोत त्या सर्वांचा रोख या उद्दिष्टांच्या पूर्तीकडे असला पाहिजे. वाङ्मय क्षेत्रातील वादाविषयी सामान्य रसिकाला फारसे घेणे- देणे नसते. त्याला नवेनवे लेखक पाहवयाचे असतात. त्यांच्याशी बोलावयाचे असते. आपण कसे लिहिले, आपल्याला काय जाणवले हे त्यांच्याकडून ऐकावयाचे असते. रसिक आणि लेखक यांच्यात होणारा संवाद हा संमेलनाचा महत्त्वाचा भाग असला पाहिजे. त्यासाठी एखाद्या कार्यक्रमात आपण भाग घेत नसलो तरीही लेखकांनी संमेलनाला आवर्जून आले पाहिजे. संमेलन हा सामंजस्य वाढविणारा, स्नेह वाढविणारा, सर्वांचे मीलन घडविणारा प्रसंग असतो. संमेलनाला गर्दी करणाऱ्या रसिकांची तीच अपेक्षा असते.

*मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारताना तुमच्या मनात कोणत्या भावना आहेत? काही नव्या योजना मनात आहेत काय?*

साहित्य संमेलनाचा अध्यक्ष हे एक तसे उत्सवी पद आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून परिषदेचा एक कार्यकर्ता म्हणून आजवर जसे काम मी करीत होतो तसेच पुढच्याही काळात करीत राहीन. माझे अध्यक्षपद हे माझ्या लेखनाप्रमाणेच परिषदेच्या सेवेची माझ्या सहकाऱ्यांनी घेतलेली दखल आहे, असे मी मानतो. मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यात अनेक छोट्या मोठ्या व्यक्तींनी वेळोवेळी हातभार लावला आहे. आपण त्या सर्वांचे प्रतिनिधी आहोत ही माझी भावना आहे. भाषा आणि वाङ्मय अधिकाधिक लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी सर्वांबरोबर काम करणे हा एक आनंदाचा अनुभव असतो. म्हणून ते काम मला आवडते.

लेखनाचे अनेक विषय मनात आहेत. लिहिण्यासारखे पुष्कळ आहे. कधी जुन्या इतिहासाकडे, कधी एकोणिसाव्या शतकाकडे, एखाद्या व्यक्तीच्या काळाआड लपलेल्या कर्तृत्वाकडे, कधी जीवनाच्या एखाद्या विभ्रमाकडे लक्ष जाते आणि आपण याबद्दल काही लिहावे असे वाटते. त्यासाठी वाचन करण्याची इच्छा होते. लिहिणे जेव्हा होईल तेव्हाच होते. परंतु वाचन सुरू झाले म्हणजे आनंदाचा एक प्रवास सुरू होतो. प्रत्यक्ष लेखनाइतकाच हाही माझ्या मनाला भावणारा भाग असतो. या वाचनाचा एक दुसराही उपयोग होतो. तो म्हणजे आपण या जीवनाव्यवहारातले किती लहान घटक आहोत याची मनाला सतत जाणीव राहते. साहित्याने मला हेही सत्य समजून घेण्याला मदत केली आहे.

*मराठवाडा हे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे केंद्र होते. आधुनिक काळात मराठवाड्यात भरघोस वाङ्मय निर्मिती का होऊ शकली नाही?*

यादवांच्या काळापासून मराठवाडा हे मराठी संस्कृतीचे केंद्र होते. लोकभाषा असलेल्या मराठीला काही काळ तरी सत्तेचा आश्रयही लाभला होता. महानुभाव पंथ, वारकरी पंथ आणि रामदासी पंथ याचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने मराठवाड्यात होते. या पंथांचे वाङ्मय येथे मोठ्या प्रमाणावर लिहिले गेले. गुलबर्ग्याजवळचे मळखेड आणि लातूर या भागांत राष्ट्रकुटांच्या काळापासून जैन संस्कृतीची केंद्रे होती. जैन मराठी वाङ्मयही या भागात लिहिले गेले. निदान १६ व्या शतकापर्यंत तरी धर्माश्रित संस्कृतीचे व तिचे अभिव्यक्ती असलेल्या मराठी वाङ्मयाचे केंद्र मराठवाड्यातच होते. विविध पंथांचे मठ हे उपासकांचे निवासस्थान आणि पूजास्थान याबरोबरच वाङ्मयाचेही आश्रयस्थान झाले. १७ व्या शतकापासून संस्कृतीचा मराठवाड्यातील हा मध्यबिंदू पश्चिम महाराष्ट्रात सरकरण्याला सुरुवात झाली. १८ व्या शतकात पश्चिम महाराष्ट्र सांस्कृतिक घडामोडींच्या केंद्रस्थानी आला. या शतकात मराठवाड्यात राजकीय अस्थिरता होती. निजामाच्या राजवटीत मराठीला आश्रय मिळणे दूरच, उर्दू राजभाषा करून मराठवाड्यावर लादण्यात आली व मराठी संस्कृतीची पिछेहाट होऊ लागली. स्वाभाविकच १७ व्या शतकापासून मराठवाड्यातील मराठी वाङ्मय निर्मिती कमी झाली.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रात आल्यापासून काही महत्त्वाचे बदल मराठी वैचारिक जीवनात झाले. इंग्रजी शिक्षणाचा एक परिणाम म्हणून व्यक्तीस्वातंत्र्य आणि समता अशी मूल्ये सुशिक्षितांच्या मानसात रुजू लागली. आपली धर्मस्थिती, समाजस्थिती आणि राजकीय परिस्थिती यांची चिकित्सा करण्यात येऊ लागली व एक मोठे विचारमंथन महाराष्ट्रात झाले. वृत्तपत्रे आणि विशिष्ट उद्दिष्टासाठी निर्माण झालेल्या सार्वजनिक संस्था यांच्यामार्फत होणारे वादविवाद, विचारांनी प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष घेतलेले वाङ्मयरूप अशा विविध माध्यमातून एक संवाद सुरू झाला. हे सर्व विचारमंथन अर्थातच मराठी भाषेतून होत होते. त्याचा एक परिणाम मराठी गद्य सशक्त होण्यात झाला. याचा दुसरा परिणाम आमच्या वाङ्मयावरही झाला. निबंधासारखा नवा वाङ्मय प्रकार जन्माला आला. कवितेने नवे वळण घेतले. लौकिक व्यक्तीभावना आणि सामाजिक आशय यांना तिच्यात स्थान मिळाले. कथा- कादंबऱ्या सामाजिक वास्तवाकडे वळल्या. दुर्दैवाने या सर्व विचारमंथनातून आणि वाङ्मयीन परिवर्तनाच्या प्रक्रियेतून मराठवाडा वगळला गेला होता. निजामाच्या अमलाखाली मराठवाड्याचा त्यात कोणताच सहभाग असणे शक्यच नव्हते. जे मुंबई- पुण्यात घडत होते त्यापैकी फारच थोडे प्रतिध्वनीच्या स्वरूपात मराठवाड्यात ऐकू येई. एखाद्या उपग्रहाने मोठ्या ग्रहाच्या भोवती अंतर राखून फिरावे असे या काळात मराठवाड्याचे मानस झाले.

स्वातंत्र्यानंतर मराठवाड्याचे सांस्कृतिक वातावरण मोकळे झाले. परंतु एखाद्या अंधार कोठडीत बराच काळ राहिल्यानंतर बाहेर आल्याबरोबर प्रकाशाने दिपून जावे तसे मराठवाड्यातील वाङ्मय विश्वाचे झाले. कोणत्याही श्रेष्ठ लेखकाच्या लेखनाचा प्रभाव इतर काही लेखकांवर पडतोच तसे इकडेही झाले. त्यातच पश्चिम महाराष्ट्रातल्या खुलेपणाची परंपरा असलेल्या सांस्कृतिक जीवनाचे आकर्षणही मराठवाड्यातील लेखकांना वाटणे स्वाभाविक होते. बी. रघुनाथांसारखे काही लेखक मात्र याला अपवाद होते. आपल्या वाट्याला आलेल्या जीवनातही वाचकांना सांगण्यासारखे पुष्कळ आहे याचा त्यांना विश्वास होता. त्यांच्या मनात न्यूनगंड नव्हता. आपल्या अनुभवाशी त्यांच्या लेखनाने राखलेले इमान हे त्या लेखनाच्या श्रेष्ठतेचे एक महत्त्वाचे कारण होते. मराठवाड्यात भरघोस वाङ्मय निर्मिती झाली नाही आणि दर्जेदार लेखनही कमी झाले. याचे एक कारण लेखकांना आपले सच्चे अनुभव वाङ्मयरूप घेऊ शकतात याबद्दलचा आवश्यक आत्मविश्वास नव्हता हे असावे. लेखकाचा आपल्या अनुभवाबद्दलचा आणि तो सांगण्यासारखा आहे याबद्दलचा विश्वास हा अनेक कारणांनी कमी किंवा अधिक होऊ शकतो. त्याची फक्त ढोबळ स्वरूपाची कारणमीमांसा करता येते. केशवसुतांनी कवीच्या आणि कवितेच्या सामर्थ्याबद्दल जो आत्मविश्वास प्रकट केला आहे तो त्या काळातील वैचारिक मंथनाचा एक परिपाक होता. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने दलित माणसांना एक आत्मभान दिले. त्यानंतर जे दलित वाङ्मय निर्माण झाले त्यामागे आंबेडकरांच्या चळवळीने त्यांना दिलेला आत्मविश्वास हे एक महत्त्वाचे कारण होते. अशी आणखीही उदाहरणे सांगता येतील. गेल्या काही दिवसांत मराठवाड्यातील लेखक जे विविध प्रकारचे अनुभव विशेषत: कविता आणि कादंबरी या माध्यमातून व्यक्त करीत आहेत त्यामागे त्यांचा वाढलेला आत्मविश्वास हेही कारण असावे.

*अलीकडच्या काळात मराठवाड्यात मोजकेच लक्षणीय लेखक उदयाला आले. हे प्रमाण महाराष्ट्र आणि विदर्भाच्या तुलनेत कमी आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी काय करता येईल?*

एखाद्या काळात एखाद्या किंवा सर्वच वाङ्मय प्रकारात फारसे चांगले लेखन होत नाही असा काळ वाङ्मयीन इतिहासात येऊन जातो. तसेच एखाद्या प्रादेशिक विभागात इतरांच्या तुलनेने कमी लिहिले जाते असेही अनेक वेळा दिसते. या सर्वांची निश्चित कारणमीमांसा करता येत नसते. परंतु काही अंदाज बांधता येतात.

गेल्या १५- २० वर्षांत महाराष्ट्राच्या इतर भागाच्या मानाने आपल्याकडे लक्षणीय लेखन संख्येने कमी झाले. त्याची अगदी नक्की कारणे सांगता येणे अवघड आहे. आपल्या

सांस्कृतिक पिछेहाटीच्या परिणामांची चर्चा आपण केलीच आहे. तेही कारण अद्याप मराठवाड्यात रेंगाळत आहे. एकंदर वैचारिक जीवनातील उदारता, विविध समाजघटकांचे एकमेकांशी असलेले सौहार्द आणि वाङमयबाह्य निकषांना बाजूला सारून लेखनाचे स्वागत करण्याची वाचकांची तयारी यांचाही ललित लेखनावर थोडाफार अनुकूल परिणाम होतो. अशी अनुकूल परिस्थिती नसेल, वातावरण ढगाळ असेल तेव्हा काही पिकांवर अनिष्ठ परिणाम होणे स्वाभाविक असते.

१९४५- १९६५ या वीस वर्षांतील एकूण मराठी ललित लेखनाचा आपण विचार केला तर उत्तमोत्तम कवी आणि कथाकार या कालखंडात लिहू लागले, वाचकांसमोर आले, असे आपल्याला दिसते. त्या तुलनेने गेल्या दहा वर्षांत अशा लक्षणीय लेखनाची संख्या कमी दिसते. त्याची कारणे अनेक असू शकतील. पण अशा कारणांची चर्चा करताना प्रतिभेच्या निरंकुशतेचे स्मरण आपण ठेवले पाहिजे. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत चांगला लेखक जन्मूही शकतो आणि अत्यंत अनुकूल परिस्थितीतसुद्धा चांगले लेखन होत नाही असेही आपल्याला दिसते. चांगले ललित लेखनही प्रयोगशाळेत नियंत्रित तपमानात जन्माला येणारी गोष्ट नाही.

या चर्चेचा अर्थ असा मात्र नाही की काही चांगले लेखन होतच नाही. असे कोणत्याच काळात आणि कोणत्याच प्रदेशात घडत नसते. काही चांगली कविता मराठवाड्यातही लिहिली गेली. आपल्या नाटककारांची नाटके महाराष्ट्रात रसिकांना भावली. काही कादंबऱ्यांनी आपले लक्ष वेधून घेतले. अर्थात असे लेखन यापेक्षा अधिक झाले पाहिजे.

*मराठवाड्यात गेली ४५ वर्षांपासून विद्यापीठीय शिक्षण उपलब्ध आहे तरीही विविध ज्ञानशाखांत आणि वैचारिक क्षेत्रात मराठीतून फारसे लिहिले गेले नाही, असे का? आणि ही स्थिती बदलण्यासाठी काय केले पाहिजे?*

विद्यापीठीय शिक्षणाचा आणि वैचारिक लेखनाचा जो संबंध तुम्ही गृहित धरला आहे तो आजच्या काळात उरलेला नाही. शिक्षण हे वैचारिक जागृतीचे व्यक्तीची गुणवत्ता वाढविण्याचे आणि सामाजिक प्रगतीचे साधन आहे ही जाणीव लुप्त होऊन शिक्षण संस्था या काही व्यक्तींना रोजगार मिळवून देण्याचे साधन आहे ही भूमिका स्वीकारली की, वैचारिक विश्वापासून शिक्षण संस्था दूर जाणार हे उघड आहे. अर्थात ही स्थिती फक्त मराठवाड्यातच झालेली नाही. देशभर ही स्थिती कमीअधिक प्रमाणात आहे. अर्थात जेथे सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरा क्षीण झालेल्या असतात तेथे ही अवनती अधिक तीव्रतेने जाणवते. नवे विचार झाले नाहीत आणि शिक्षण आणि वैचारिक विश्व यांचा संबंध जर शिल्लक राहिला नाही तर पुढच्या अनेक पिढ्यांचे नुकसान होते हे समाजाचे नेतृत्व करणाराना कळले पाहिजे. विद्यापीठात किंवा एखाद्या महाविद्यालयात अयोग्य व्यक्तीला नेमणे म्हणजे आपल्याच मुलाबाळांच्या अहिताची तरतूद करणे आहे हे जर कळत नसेल तर शिक्षण संस्थांकडून अधिक अपेक्षा काय करणार? अपवाद वगळले तर शिकवणारे स्वत:च काही वाचीत नाहीत आणि फारसे शिकवितही नाहीत. अशी स्थिती असेल तर विविध ज्ञानशाखांतील नव्या संशोधनाचे आणि विचारमंथनाचे केंद्र शिक्षण संस्था व्हाव्यात ही अपेक्षा कशी करता येईल?

विविध ज्ञानशाखांत वैचारिक लेखन होत नाही याचे एक महत्त्वाचे कारण असे की समाजाच्या प्रगतीसाठी विचारांची आवश्यकता आहे असे आजचे नेतृत्व मानतच नाही. समाजाला नवे विचार शिकवावे, माणसाची मने विशाल करावीत, परिर्वतनाचा आधार विचार हा असावा व वैचारिक विश्व उदारतेच्या पायावर उभे असावे, असे मानले गेले तरच विचारांना समाजात स्थान राहील. आमचे राजकारण आणि समाजकारण यांच्यातील वैचारिक प्रक्रियेचे स्थान जर कमी कमी होत गेले तर नवे वैचारिक लेखन फारसे होणारच नाही. समाजाची मानसिकता तयार करण्यात विचारांचे महत्त्व तर आहेच. शिवाय लोकशाही व्यवस्थेत समाजाच्या भौतिक प्रगतीशीसुद्धा विविध ज्ञानशाखातील तज्ज्ञांच्या विचारांची मदत आवश्यक असते. आमची शासनव्यवस्था व शैक्षणिक संस्थातील तज्ज्ञ यांचाही आपण संबंध वाढवलेला नाही. समाजाचे आपण काही देणे घेणे लागतो असेच शैक्षणिक जग मानत नाही. परिणामत: अभ्यासक्रमापुरातच विचार केला जातो. व्यापक प्रश्नासंबंधी विचार करण्याची परंपरा निर्माण होत नाही. अर्थात हे फक्त मराठवाड्यात आहे असे म्हणणे बरोबर नाही. ही परिस्थिती बदलण्याला दीर्घ काळ लागेल आणि उदारमतवादी लोकशाही जीवनपद्धती एक मूल्य म्हणून मनात रुजवावी लागेल. ते एक अवघड आणि दीर्घकाळ करावे लागणारे काम आहे.